दाखल दिनांक : ०१.११.२०१२
नोंदणी दिनांक : ०१.११.२०१२
निकाल दिनांक : २१.१२.२०१६
कालावधी : ४व. १म. २०दि.

## पुणे येथील सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर पुणे यांचे न्यायालयात

(पिठासन अधिकारी : प्र. र. अष्टुरकर)

**स्पे.मु.नं.१५००/२०१२**
**नि.क्र.४७**

**'शुभम आउटडोअर ॲडव्हरटायझिंग'**
तर्फे – प्रोप्रायटर,
श्री. शेखर विठ्ठल मते
वय – ४६, धंदा – व्यवसाय,
कार्यालय पत्ता – ३०१, कल्पवृक्ष,
म्हात्रे ब्रिज, गुरुकुल लॉन्सच्या समोर,
सुर्यदत्त इन्स्टिटयुट जवळ, कोथरुड,
पुणे – ३८. .... वादी.

**विरुध्द**

**मे. भुजबळ ब्रदर्स कन्स्ट्रक्शन कंपनी,**
तर्फे – प्रोप्रायटर,
श्री. सूरज रमन भुजबळ,
वय –सज्ञान, धंदा – व्यवसाय,
रा. भुजबळ हाउस, दामोदर इस्टेट,
विंग १, भुजबळ बाग,
कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२. .... प्रतिवादी.

**दावा रक्कम रु. १७,७०,३०९/– वसुलीकरिता.**

**उपस्थिती** :

वादीतर्फे ॲडव्होकेट : श्री. अे. टी. शिरसाट
प्रतिवादी तर्फे ॲडव्होकेट : श्री. आर. व्ही. नांगरे

## न्यायनिर्णय

**(घोषित दिनांक २१.१२.२०१६)**

सदरचा दावा वादीने रक्कम वसुलीकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या दाव्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे :—

वादी हे शहरातील विविध ठिकाणी जाहीरात फलकांचा''**शुभम आउटडोअर ॲडव्हरटायझिंग''** या नावाने व्यवसाय करतात. प्रतिवादी हे 'मे. भुजबळ ब्रदर कन्स्ट्रृक्शन कंपनी' या नावाने बांधकामाच्या व्यवसायात आहे. त्यामुळे प्रतिवादी हे वादीकडे आले व आपल्या कंपनीची जाहीरात वादीच्या जाहीरात फलकावर करावी, अशी विनंती केली. त्या अनुषंगाने त्यांनी वादीला दिनांक २०.४.२०११ रोजी लेखी आदेश दिला. त्यानुसार वादीने दाव्यात नमुद केलेप्रमाणे शहरातील विविध ठिकाणी जाहीरात फलकावर प्रतिवादीच्या कंपनीची जाहीरात केली. दिनांक २१.४.२०११ रोजीच्या कराराप्रमाणे जाहीरातीचे मोजमाप व त्या अनुषंगाने दर ठरविण्यात आले. सदरचा करार सहा महिन्यांपर्यत वैध होता. ठरल्याप्रमाणे जाहीरात करुन वादीने प्रतिवादीकडे एकूण सहा बीले पाठविली व त्यामध्ये नमूद असलेल्या रकमांची मागणी केली. बिलांची एकुण रक्कम रु २२,७०,३०९/— एवढी होती. प्रतिवादीने सर्व बीले स्विकारली व त्याबद्दल कधीही तक्रार केली नाही. त्यानंतर वादीने वेळोवेळी स्वत: जावुन व फोन करुन बिलांच्या रकमांची मागणी केली. त्या अनुषंगाने दिनांक ५.५.२०१२ रोजी पत्र देखील पाठविले. वारंवार मागणी करुन देखील प्रतिवादीने रकमेचा परतावा केला नसल्यामुळे वादीने दिनांक २२.६.२०१२ रोजी नोटीस पाठवून थकीत रक्कम दहा दिवसांच्या आत २४ टक्के व्याजासह परत देण्याची मागणी केली. त्या नोटीसीचे उत्तर प्रतिवादीने दिनांक २५.६.२०१२ रोजी पाठविले व त्यासोबत रक्कम रु. ५,००,०००/— चा धनादेश दिला. प्रतिउत्तर देताना प्रथमत:च प्रतिवादीने असा आक्षेप घेतला की, त्यांना वादीतर्फे देण्यात आलेल्या सेवा अपु—या भासतात. प्रतिवादीने रक्कम दिलेली नसल्यामुळे सरतेशेवटी वादीने सदरचा दावा दाखल करुन, प्रार्थनेनुसार दावा मंजुर व्हावा, अशी विंनती केली.

३. प्रतिवादीने नि. क्र. १३ ला आपले लेखी म्हणणे दाखल करुन दाव्यातील संपुर्ण कथने अमान्य केली. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीने दाव्याच्या कथनात जाणूनबुजुन महत्वाच्या काही गोष्टी लपवून ठेवल्या आहेत. वादीने खोटया

कथनांच्या आधारे सदरचा दावा दाखल केला आहे. वादीने जरी श्री. सुरज रमन भुजबळ यांना प्रतिवादी कंपनीचा प्रोप्रायटर म्हणून दाव्यात दाखल केले असले तरी ते कंपनीचे प्रोप्रायटर नाहीत. त्यामुळे दावा आवश्यक पक्षाच्या आधारे खारीज होण्यास पात्र आहे. इतर सर्व बाबी जशाच्या तशा नाकारल्या आहेत. प्रतिवादीने पुढे असे नमूद केले की, वादीने दिलेल्या सेवा अपु—या व तोडक्या होत्या. सेवांचा दर्जा हा प्रतिवादीच्या अपेक्षेप्रमाणे नव्हता. वादीच्या जाहीरातीचे फलक हे इतर राजकीय पक्षांच्या जाहीरातींमुळे झाकून गेलेले होते. जाहीरात फलकांना विशिष्टपणे दिव्यांचा उजेड देखील नव्हता. त्यामुळे रात्रीच्या वेळी जाहीरात फलक व्यवस्थितपणे दिसत नव्हते. वादीच्या अशा प्रकरच्या जाहीरात फलकामुळे प्रतिवादीचे अतोनात नुकसान झाले व त्याच्या बांधकाम व्यवसायावर परिणाम झाला. प्रतिवादी स्वत: वादीविरुध्द कायदेशीर कारवाई करणार होते व उपरोक्त सर्व कारणांमुळे प्रतिवादी हे वादीचे कोणतेही देणे लागत नाही. करिता, प्रतिवादीने वादीचा दावा हा खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनावरुन माझे पूर्वाधिका—याने खालील मुद्दे नि. क्र. १५ ला काढलेले आहेत. त्यावर मी माझे कारणेमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने हे सिध्द केले आहे काय की, प्रतिवादीकडून त्याला रक्कम रु. १७,७०,३०९/— येणे बाकी आहे ? | ...नकारार्थी. |
| २ | प्रतिवादीने हे सिध्द केले आहे काय की, वादी हा दिनांक २१.०४.२०११ रोजीच्या कराराप्रमाणे सुयोग्य सेवा देण्यास असमर्थ ठरला ? | ...नकारार्थी. |
| ३ | दावा हा आवश्यक पक्षकारांच्या असंयोजनामुळे सदोष आहे काय ? | ...होकारार्थी. |
| ४ | वादी हा प्रार्थनेनुसार मागितलेल्या व्याजासह रकमेला हक्कदार आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ५ | आदेश व हुकूमनामा कोणता ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणेमिमांसा

५. दाव्यातील मुद्दयांची चर्चा करण्यापूर्वी, सर्वप्रथम हे नमुद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादीने दाव्यात जरी आपले लेखी म्हणणे दाखल केले असले तरीही त्या अनुषंगाने कोणताही लेखी किंवा तोंडी पुरावा देण्याचे कष्ट घेतलेले नाहीत. अशा परिस्थितीत, कोणत्याही पुराव्याअभावी त्याच्या लेखी कथनाला कोणतेही स्थान उरत नाही. अशा परिस्थितीत, हे पाहणे आवश्यक ठरेल की, वादीने दाव्यात केलेल्या कथनांच्या अनुषंगाने आपला दावा सिध्द केला आहे काय.

**मुद्दा क. १** :—

६. वादीने आपल्या कथनांच्या पुष्ठयर्थ फक्त स्वतःची साक्ष नि. क. १६ प्रमाणे दाखल केली आहे. त्यासोबत त्याने खालील प्रकारची कागदपत्रे दाखल करुन सिध्द केलेली आहेत.

**१. प्रतिवादीने वादींना दिलेली परचेस ऑर्डर दिनांक २०.०४.२०११, मूळ प्रत, नि. क. १८,**

**२. वादीने प्रतिवादींना दिलेली परचेस ऑर्डर दिनांक २०.०४.२०११, मूळ प्रत, नि. क. १९,**

**३. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये झालेला करारनामा, दिनांक २१.०४.२०११, मूळ प्रत, नि. क. २०,**

**४. वादीने प्रतिवादींना दिलेले बिल क. २०१/११—१२, दिनांक २१.०४.२०११, नि. क. २१,**

**५. वादीने प्रतिवादींना दिलेले बिल क. ३११/११—१२, दिनांक २१.०५.२०११, नि. क. २२,**

**६. वादीने प्रतिवादींना दिलेले बिल क. ४०८/११—१२, दिनांक २१.०६.२०११, नि. क. २३,**

**७. वादीने प्रतिवादींना दिलेले बिल क. ५०९/११—१२, दिनांक २१.०७.२०११, नि. क. २४,**

८. **वादीने प्रतिवादींना दिलेले बिल क्र. ७०९/११—१२, दिनांक २१.०९.२०११, नि. क्र. २५,**

९. **वादीने प्रतिवादींना दिलेले बिल क्र. ८१२/११—१२, दिनांक २१.१०.२०११, नि. क्र. २६,**

१०. **वादीने प्रतिवादींना पाठविलेली कायदेशीर नोटीस दिनांक २२.०६.२०१२, नि. क्र. २७,**

११. **प्रतिवादीने वादींना पाठविलेले नोटीस उत्तर, दिनांक २५.०६.२०१२, नि. क्र. २८,**

१२. **वादीने प्रतिवादीला पाठविलेले ईमेल फोटोज, एकूण १२, दिनांक २२.०८.२०११, नि. क्र. २९,**

१३. **वादीने प्रतिवादी यांना पाठविलेले पत्र व त्याची पोचपावती, मूळ प्रत, दिनांक ०५.०५.२०१२, नि. क्र. ३०,**

१४. **प्रतिवादीने दिनांक ०५.०५.२०१२ चे पत्र स्विकारल्याची रजि. पोस्टाची पोचपावती, दिनांक ०७.०५.२०१२, नि. क्र. ३१.**

प्रतिवादीने वादीची तांत्रिक व कायदेशीर मुद्दंयावर उलटतपासणी घेत, दावा हा मुळातच चालविण्यास योग्य नाही, असे दर्शविण्याचा कसून प्रयत्न केला आहे.

७. उलटतपासणीचे सुरुवातीला प्रतिवादीने वादीला प्रकरणात **''शुभम आउटडोअर ॲडव्हरटायझिंग''** या नावाने असलेला व्यवसाय परवाना किंवा उपरोक्त संस्थेचा वादी प्रोप्रायटर आहे, हे दर्शविणारा दस्तऐवज दाखल करणेबाबत सुचविले होते. सदरचा तांत्रिक मुद्दा हा प्रतिवादीने आपल्या लेखी कथनातील बचावाच्या अनुषंगानेच विचारलेला आहे. वादीने जरी तो प्रोप्रायटर असून, दावा दाखल करण्यास अधिकृत असल्याबाबत पुरावा दाखल करण्याची तयारी दर्शविली तरी त्याने आजपर्यंत कोणताही दस्तऐवज किंवा पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही. मूळातच, वादीची दावा दाखल करण्याची अधिकारिता आव्हानित केली असताना, वादीचे हे आद्य कर्तव्य होते की, त्याने त्या प्रकारचा पुरावा प्रकरणात दाखल करावयास हवा होता. वादी हा अशा प्रकारचा दस्त प्रकरणात दाखल करुन

स्वत:ची अधिकारता सिध्द करु शकला असता, परतुं, तसे न करता वादी का शांत बसला, हे त्याचे तोच जाणो. स्वत:च्याच अधिकारितेबाबतचा दस्त उपलब्ध असू शकल्याचा पुरावा किंवा दस्त दाव्यात दाखल न केल्याने, वादी दावा दाखल करणेकरिता अधिकृत आहे किंवा कसे, ही बाब अनुत्तरितच राहाते.

८. एवढेच नसून, उलटतपासणीत पुढे चालून वादीने अशी काही वक्तव्ये केली की, त्यामुळे तो दावा दाखल झाल्यापासून किंवा पुरावा देण्याच्या तारखेपर्यत संभ्रमातच होता, हे दिसून येते. प्रतिवादीने आपल्या लेखी कथनात हे नमूद केले आहे की, वादीने चुकीच्या वर्णनाच्या आधारे प्रतिवादीविरुध्द दावा दाखल केला असून, प्रतिवादी ही प्रोप्रायटरी संस्था नसून ती कंपनी आहे. अशा प्रकारे स्पष्टपणे प्रतिवादीने आपली स्वत:ची ओळख आव्हानित केलेली असल्याने वादीने त्या अनुषंगाने, ठोस पुरावा देणे अपेक्षित होते. कायद्याचे हे गृहीतच आहे की, वादीला स्वबळावर आपला दावा ठोसपणे सिध्द करणे आवश्यक असते. वादी प्रतिवादीच्या कमकुवतपणाचा फायदा घेवून दावा सिध्द झाला, असे म्हणू शकत नाही.

९. उलटतपासात प्रतिवादीने वादीला स्पष्टपणे, प्रतिवादीच्या नेमक्या कायदेशीर स्थानाबाबत विचारणा केली होती. वादीने त्याला उत्तर देताना असे नमूद केले की, त्याने प्रतिवादीला आपल्या दाव्यात प्रोप्रायटर संबोधले आहे काय किंवा त्या अनुषंगाने समाविष्ट केले आहे हे त्याला माहीत नाही. सूरज भुजबळ हे भुजबळ कंपनीचे प्रोप्रायटर आहेत काय, याची खातरजमा त्याने दावा दाखल करताना किंवा आजपर्यत केली नाही. पुढे वादीने नमूद केले की, त्याच्या म्हणण्याप्रमाणे सूरज भुजबळ हे मे. भुजबळ ब्रदर्स कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रोप्रायटर आहेत व त्यामुळे त्याने त्यांचेविरुध्द प्रोप्रायटर या नात्याने दावा दाखल केला आहे. परतुं, आश्चर्यकारकरित्या पुढच्या प्रश्नात, प्रतिवादी कंपनी आहे, म्हणून त्याने दावा दाखल केल्याचे नमूद केले. प्रतिवादीने आपली 'लेखी कैफियत' दाखल करताना 'मे. भुजबळ ब्रदर्स कन्स्ट्रक्शन कंपनी' ही प्रोप्रायटरी फर्म नसल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. वादी हा एका श्वासात प्रतिवादीला 'प्रोप्रायटर' तर दुस—या श्वासात प्रतिवादी 'कंपनी' असल्याचे नमूद करतो. एवढेच नसून, लेखी कथनात प्रतिवादीने स्पष्टपणे कायदेशीर

ओळखीबाबतचा बचाव घेतलेला असताना, वादीने आजपर्यंत कधीही प्रतिवादी कंपनी आहे किंवा कसे, तसेच प्रतिवादीचे कायदेशीर स्थान/ओळख काय आहे, ही बाब जाणून घेण्याची तसदी घेतलेली नाही. अर्थातच, यापूर्वी नमुद केलेप्रमाणे वादीला स्वबळावर व स्वकष्टाच्या आधारे दावा सिध्द करणे आवश्यक आहे. प्रतिवादीने त्याचे लेखी कथनात कायदेशीर ओळख आव्हानीत केलेली असताना, वादीचे हे सिध्द करणे कर्तव्य होते की, प्रतिवादीविरुध्दचा दावा हा कायदेशीर स्थानाच्या अनुषंगाने ठोस पुराव्यासह दाखल केलेला आहे.

१०. वादीने आपल्या उलटतपासणीत नमूद केले की, श्री. सूरज भुजबळ हे प्रोप्रायटर आहेत, हे दर्शविणारा त्याच्या शब्दांशिवाय दुसरा कोणताही पुरावा त्याने दाखल केला नाही. तसेच प्रतिवादी ही कंपनी आहे, याची त्याला माहीती आहे, हे त्याने कबूल केले आहे. असे असताना व पुराव्याची संधी असूनही वादीने केवळ स्वत:चाच पुरावा देवून घाईघाईने पुरावा का बंद केला, याचे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. वादी हा प्रतिवादी कंपनी आहे, याची माहीती असताना सहजच त्या अनुषंगाने पुरावा दाखल करु शकला असता. कंपनीच्या संकेतस्थळावर जावून वादीला त्या अनुषंगाने आवश्यक माहीती अंत्यत सहजपणे उपलब्ध झाली असती. असे असतानाही, वादीने कोणताही प्रयत्न केलेला दिसुन येत नाही. एवढेच नसून, वादीने हे कबूल केले की, प्रतिवादी कंपनीचे संचालक कोण आहेत, याचा त्याने शोध घेतला नाही किंवा प्रतिवादी सूरज भुजबळ हे कंपनीचे संचालक आहेत किंवा नाही हेही त्याला माहीत नाही. प्रतिवादी कंपनीचे कायदेशीर स्थान माहीत नसल्यामुळे व कंपनी या नात्याने सर्व संचालकांना दाव्यात सामील करुन घेतले नसल्याचे वादीने नमूद केले आहे. वादीला जर प्रतिवादी कंपनी आहे, याची पुर्वीपासुन कल्पना होती, तर, अशा परिस्थितीत स्वत:च्या निष्काळजीपणाचा वादीला कोणताही फायदा मिळणार नाही. वादीचा स्वत:च्याच दाव्याबद्दल असलेला निष्काळजीपणा स्पष्टपणे दिसून येतो. एकतर वादी हा अत्यंत मोघम वर्णनाच्या अनुषंगाने प्रतिवादीला दाव्यात सामील करु पाहत आहे. तो प्रतिवादीच्या नेमक्या स्थानाबद्दल संभ्रमित आहे, हेच उपरोक्त पुराव्यावरुन दिसून येते. वादीचा दावा मुळातच नेमक्या प्रतिवादींविरुध्द नसल्यामुळे, तो सद्य दावे कथनांच्या आधारे व पुराव्याच्या अनुषंगाने कोणतीही दाद

मागण्यास हक्कदार राहात नाही. करिता मी हे ठरवितो की, वादीने हे सिध्द केले नाही की, दाव्यात नमूद केलेप्रमाणे, प्रतिवादीकडून रक्कम रु. १७,७०,३०९/— येणे बाकी आहे. त्यानुरुप, मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २** :—

११. प्रतिवादीने दावे कथनांच्या अनुषंगाने कोणताही पुरावा दिलेला नसल्याने, मी हे ठरवितो की, प्रतिवादीने सिध्द केले नाही की, वादीने सदोष सेवा दिली. करिता, मी मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ३** :—

१२. अर्थातच, प्रतिवादीने ती प्राप्रोयटरी फर्म नसल्याचे नमूद केले आहे. वादीला प्रतिवादी ही कंपनी असल्याचे सर्वस्वी ज्ञात आहे. उलटतपासात त्याने हे कबूल देखील केले आहे. अशा परिस्थितीत, कंपनीच्या सर्व संचालकांना प्रकरणात दाखल केलेले नसल्याने किंवा त्या अनुषंगाने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नसल्याने, अर्थातच, दावा हा आवश्यक पक्षकारांच्या असंयोजनामुळे सदोष आहे. करिता, मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर होकारार्थी नमूद करतो.

**मुद्दा क्र. ४** :—

१३. उपरोक्त मुद्दे क्र. १ व ३ ला दिलेल्या निष्कर्षांनुसार हे स्पष्ट होते की, वादीने मुळातच नेमक्या प्रतिवादींविरुध्द दावा दाखल केला नसल्यामुळे व दाव्यामध्ये सर्व पक्षकारांना सामील केले नसल्यामुळे, तो कोणत्याही प्रकारची दाद मिळण्यास हक्कदार राहात नाही. करिता मुद्दा क्र. ४ चे उत्तर नकारार्थी देवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. दावा फेटाळण्यात आला.

२. सद्य परिस्थितीत, दोन्ही पक्षांनी आपापला खर्च सोसावा.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा काढणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषित केला.)

(प्र. र. अष्टुरकर)
दिनांक : २१.१२.२०१६. सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पुणे.

I affirms that, the contents of the P. D. F. file Judgment are same word for as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Sou. C. N. Jagtap |
| Court Name | : | P. R.Ashturkar<br>Jt. Civil Judge, S. D. Pune. |
| Date | : | 21.12.2016 |
| Judgment signed by Presiding Officer on | : | 23.12.2016 |
| Judgment uploaded on | : | 23.12.2016 |